## महाराष्ट्र राज्य गुजराती साहित्य अकादमीमार्फत आयोजित कार्यक्रमाबाबतची नियमावली

- **लोकसाहित्य डायरा :-**

**महाराष्ट्रात ज्या शहरांमध्ये गुजराती समाजाची मोठ्या प्रमाणात वस्ती आहे, अश्या शहरांमध्ये गुजराती लोकसाहित्य डायरा किंवा कवीसंमेलन अशा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येईल. प्रत्येक वर्षी ४ शहरांची अकादमीचया कार्यकारी समितीच्या बैठकीमध्ये निवड करण्यात येईल व तेथे लोकसाहित्य डायरा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येईल. त्यामुळे कार्यक्रमासाठी रु. २.०० लाख इतक्या मर्यादेपर्यंत खर्च करण्यात येईल. त्यामुळे या प्रयोजनासाठी एकूण रु. ८.०० लाख इतका खर्च करण्यात येईल. अकादमीच्या कार्यकारी समितीच्या बैठकीत शहरांची नावे अंतिम झाल्यानंतर खर्चाच्या बाबवर सविस्तर प्रस्तावास शासन मान्यता घेऊन त्यानंतर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावे.**